# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८०१/२००७.

श्री. सुनिल के. अभिचंदानी,
१४२, रेसीडेन्सी रोड, सदर,
नागपूर - ४४० ००१. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. डी. एस. मेहर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
नगर रचना,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००६ रोजी अशफाक खान, सदर बाजार, मेश्राम चौक, रेसीडेन्सी रोड, सदर येथील अनधिकृत बांधकाम पाडण्याचे मा.उपनिगम आयुक्त यांचे आदेश दिनांक २४.७.१९९६

अन्वये आहेत. परंतु आपण अनधिकृत बांधकाम १० वर्षे झाले तरी का पाडले नाही ? सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००७ रोजी संदर्भाधिन अर्जान्वये आपण मागितलेली माहिती हा अभिलेखाचा भाग नाही. त्यामुळे आपणांस माहिती देणे शक्य नाही.

... २



रेसिडेन्सी रोड, सदर येथील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही कां करण्यांत आली नाही. याबाबत आपण महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा. असे सहाय्यक संचालक (प्र.) नगर रचना, महानगरपालिका नागपूर यांच्याकडे सही नसलेल्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले दिसून येते. सदरच्या पत्रामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.५.२००७ रोजी देण्यात आलेला असून "माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत एखाद्या प्रकरणी काय कारवाई करण्यांत आली याबाबत माहिती मागविता येते. परंतु कारवाई कां करण्यांत आली नाही किंवा केव्हा करण्यांत येणार आहे. यासाठी माहिती देण्यांकरिता माहिती अधिकाऱ्यांना बाध्य करता येणार नाही. तसेच माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित झोनकडून माहिती घेऊन अनाधिकृत बांधकामासंबंधी केलेल्या कार्यवाहीचे संबंधाने अपिलार्थींना १५ दिवसांचे आंत स्पष्टपणे वस्तुस्थितीदर्शक उत्तर पाठवावे. तसेच यापुढे उत्तर पाठवितांना पत्रावर स्वाक्षरी आहे किंवा नाही याची खात्री करुन विहित मुदतीचे आंत उत्तर पाठविण्याची दक्षता घ्यावी व अनुपालन अहवाल सादर करावा असे निर्देश देऊन अपील निकाली काढण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक १४.१२.२००६ च्या अर्जान्वये विचारलेली माहिती ती जरी प्रश्नार्थक स्वरुपात असल्यामुळे दिनांक २४.७.१९९६ च्या उपनिगम आयुक्त यांच्या आदेशावर कार्यवाही काय झाली आहे अशा प्रकारची माहिती त्यांनी मागितली आहे व त्यामुळे झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये कागदपत्राची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे. परंतु अपीलकर्ता यांना उत्तर पाठवितांना एकतर दिनांक १२.१.२००७ च्या पत्रावर तत्कालीन सहाय्यक संचालक (प्र.) नगर रचना, महानगरपालिका, नागपूर यांनी सही केलेली नाही. तसेच माहिती मागण्याचा विचार न करता अभिलेखाचा भाग नाही असे उत्तर दिले हे अतिशय बेजबाबदार पणे त्यांचा अर्जास हाताळला गेला आहे असाच निष्कर्ष काढावा लागतो व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असाही निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलात सुध्दा माहिती उपलब्ध करुन

द्यावी असा निर्णय दिलेला असून ती माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे जे जे अधिकारी व कर्मचारी संबंधित नस्तीच्या संदर्भामध्ये जबाबदार आहेत ते सर्व दोषी आढळून येतात व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३



## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक १४.१२.२००६ च्या अर्जाप्रमाणे तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दिनांक २९.५.२००७ च्या निर्णयाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) संबंधित जनमाहिती अधिकारी तसेच इतर अधिकारी व कर्मचारी सदरची नस्ती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये ज्यांचे ज्यांचे सहाय्य घेतले आहे असे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे संबंधी चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्या सर्वांचे विरुध्द रुपये २५,०००/- शास्ती अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे लादण्यात येत आहे.

३) सदरच्या शास्तीची अंमलबजावणी आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी करावयाची आहे.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांना स्वतंत्रपणे रजिस्टर पोष्टाने पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २२.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**विदर्भ क्षेत्र, नागपूर.**